# वृत्तपत्र लेखक संघात अभ्यास शिबिर

लोअर परळ (बातमीदार) : दादर येथील मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने रविवारी (ता.२३) १० ते ५ या वेळेत शिंदेवाडी महापालिका शाळा, पालव मार्ग येथे अभ्यास शिबिर होणार आहे. शिबिरात वृत्तपत्र लेखन का व कसे करावे, यावर ज्येष्ठ पत्रकार वसंत सोपारकर यांचे मार्गदर्शन, अर्थतज्ज्ञ दिलीप सामंत 'शेअर मार्केट, म्युच्युअल फंड : आर्थिक गुंतवणूक आणि व्यवहार' यावर मार्गदर्शन करणार आहेत; तर मासिके आणि दिवाळी अंकाचे संपादन आणि जाहिराती मिळविण्याचे तंत्र या विषयावर बबनराव पाटील मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षणार्थींची संख्या मर्यादित आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : श्रीकांत मयेकर- ९८२१४६९०७२, राजन देसाई- ९८६९११९५०७.